


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १२३ ●शनिवार, दि. ०२ ऑगस्ट २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# न्याय मिळणारच; मनोज जरांगे पाटलांचा विश्वास !

## ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या पाठीशी सर्व समाज



■ एसआयटी स्थापन; आयपीएस पंकज कुमावत बीडच्या मैदानात !

■ बहिण भावांशी वैर नाही; चेल्यांना सांभाळा; ज्ञानेश्वरी ताई यांच्या पाठीशी बीड जिल्हा







**बीड । प्रतिनिधी**

प्रशासनाला सर्व पुरावे दिले आहेत, मात्र आरोपींना अटक होत नाही. आत्तापर्यंत आठ तपास अधिकारी बदलले आहेत तरीही मुंडे कुटूंबियांना न्याय मिळालेला नाही. आता मात्र जातीपातीच्या भिंती तोडून मनोज जरांगे पाटील पाठीशी उभे राहिले आहेत. यामुळे न्याय मिळाल्याशिवाय मागे हटायचं नाही असा निर्धार बीडमध्ये सुरू असलेल्या व्यापक बैठकीत उपस्थितांनी व्यक्त केला. या बैठकीस स्व. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी ताई मुंडे व कुटूंबिय त्याचबरोबर स्व. संतोष देशमुख यांचे बंधु धनंजय देशमुख व कुटूंबिय उपस्थित होते. बीड येथील रामकृष्ण मंगल कार्यालयात दुपारी स्व. महादेव मुंडे यांच्या कुटूंबियांना न्याय देण्यासाठी सर्वपक्षीय, सर्वधर्मिय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला खा. बजरंगबप्पा सोनवणे, आ. संदीपभैय्या क्षीरसागर उपस्थित होते. मात्र ते सर्वसाम ान्यांप्रमाणे स्टेजसमोर खाली

▶▶ उर्वरित पान २ वर

### • परळीत गुंडांच्या टोळ्या सक्रिय : खा. बजरंग सोनवणे



बीड शहरात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला खा. बजरंग सोनवणे यांनी उपस्थित राहात ज्ञानेश्वरीताईला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे मत व्यक्त केले. तसेव आमची भगिणी २१ महिन्यांपासून न्याय मागले तरी अजूनही न्याय मिळाला नाही. सर्वात भयानक संघटना, टोळ्या परळीत असल्याचे मत यावेळी खा. बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले. सर्व धर्मीय समाजाने ज्ञानेश्वर ताई मुंडे यांच्या पाठीशी उभे राहण्याचे संकल्प केले असून मुंडे कुटुंबीयांसाठी आपण सदैव लढा देणार असल्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी यावेळी सांगितले.

### • एसआयटी स्थापन झाल्यामुळे सर्व आरोपी गजाआड होतील: आ. सोळंके



बीड शहरात पार पडलेल्या व्यापक बैठकीला माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मनोज जरांगे यांनी आ. सोळंके यांचे विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना आ. सोळंके म्हणाले की, मनोजदादा या लढ्यामध्ये जो काही निर्णय घेतील त्या निर्णयासोबत आम्ही आहोत, तसेच एसआयटी स्थापन झाल्यामुळे लवकरच यातील सर्व आरोपी गजाआड होतील असे मतही यावेळी प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले.

### • खऱ्या अर्थाने न्याय मिळेल: आ. संदीप क्षीरसागर



संतोष देशमुख प्रकरणामध्ये सर्वात पहिले वाल्मिक कराडचा कसा संबंध आहे यासंदर्भात आ. संदीप क्षीरसागर यांनी आवाज उठवला होता. यानंतर खऱ्या अथनि या प्रकरणावर जोरदार चर्चा सुरू झाल्या. ज्ञानेश्वरी मुंडेताईला न्याय देण्यासाठी आता आ. संदीप क्षीरसागर सुद्धा पुढे आले आहेत. बैठकीमध्ये मनोज जरांगे पाटील आल्यामुळे आता मुंहे कुटुंबीयाला न्याय मिळेल असा विश्वास सुद्धा आ. संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त केला. तरोच परळी पॅटर्न, खोटे गुन्हे यासंदर्भात सुद्धा संदीप क्षीरसागर यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मनोज जरांगे पाटील यांनी या प्रकरणावर लक्ष दिले असून आता मुंडे कुटुंबीय व ज्ञानेश्वरी ताई यांना न्याय मिळणारच.



*लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करतांना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, देवीशीह शिंदे*

# शिवशाही बसच्या धडकेत रिक्षा चालकाचा मृत्यू, संतप्त नागरिकांकडून बसची तोडफोड

**परळी वै. । प्रतिनिधी**

तालुक्यातील पांगरी तांडा परिसरात एक ऑगस्ट रोजी सकाळी नऊच्या सुमारास भीषण अपघात झाला. बीडहून नांदेडकडे जाणाऱ्या शिवशाही एसटी बसने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षाचालक जागीच ठार झाला. या घटनेने परिसरात तणाव निर्माण होऊन काही काळासाठी वाहतूक ठप्प ▶▶ उर्वरित पान २ वर



# शिवाईनगरी येथे चोरट्यांचा धुमाकूळ

## तिन घरे फोडले ; लाखोंचा ऐवज केला लंपास

**गेवराई । प्रतिनिधी**

येथील शिवाई नगरी येथे गुरुवारी रात्री चोरट्यांचा धुमाकूळ तिन घरे फोडले बसवंत लांडगे हे बाहेरगावी कामानिमित्त गेले असता तसेच त्यांच्या पत्नी चे दुखत असल्यामुळे दवाखान्यात ऍडमिट असल्याने घराला कुलूप असल्याने त्यांच्या घरी अज्ञात

▶▶ उर्वरित पान २ वर







# नीता अंधारे यांची बदली! अखेर अंधार हटला

## परंतु या अंधारात काय काय घडले याची सखोल तपासणी व्हावी ही बीड शहर बचाव मंचाची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांची बदली करण्यात आली आहे. यांची बदली करण्यात यावी अशी मागणी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने सातत्याने लावून



धरण्यात येत होती. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना वारंवार भेटून बीड शहर बचाव मंचाच्या वतीने निवेदने देण्यात आलेली आहेत. नगरपालिकेचा गलथान कारभार व त्यामुळे नागरिकांनाचे होत असलेले हाल याबद्दल प्रशासनाला सातत्याने अवगत करून देण्यात आलेले आहे. मुख्याधिकारी नीता अंधारे यांची जरी बदली झाली असली तरी त्यांच्या कार्य काळाम ध्ये झालेल्या सर्व कामकाजांची सखोल कसून तपासणी करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

# सावता सेनेच्या वर्धापनदिन निमित्त वर्षा शिंदे यांचा अभिनव उपक्रम

## विधवा महिलांसाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण

**पाटोदा । प्रतिनिधी**



सावता सेनेच्या नवव्या वर्धापन दिना निमित्त सामाजिक भान जपत मराठवाडा महिला विभागीय अध्यक्षा सौ. वर्षा शिंदे यांनी एक प्रेरणादायी आणि स्तुत्य उपक्रम राबविला आहे. त्यांनी विधवा महिलांसाठी मोफत ब्युटी पार्लर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करून त्यांना आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक नवी वाट दिली आहे.या उपक्रमाचा उद्देश केवळ आर्थिक स्वावलंबन नव्हे, तर महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आहे. विधवा महिलांना समाजात स्वाभिमानाने जगता यावे, त्यांच्या कर्तृत्वाला एक व्यासपीठ मिळावे, या हेतूने या प्रशिक्षणाची सुरुवात करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन सावता सेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी अनेक महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सौ. वर्षा शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले, महिलांना सक्षम करणे ही काळाची गरज आहे. विधवा महिलांना केवळ मदतीची नाही, तर संधीची गरज आहे. आणि हे प्रशिक्षण त्याच दिशेने एक पाऊल आहे.या उपक्रमामुळे अनेक महिलांचे आयुष्य बदलण्याची शक्यता असून, सावता सेनेच्या सामाजिक जाणिवेचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरले आहे.

# प्राध्यापक, कर्मचारी मारतायत हॉटेलवर मज्जा; गुणवत्तेचा उडाला फज्या



## प्राचार्यांचा प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचाऱ्यावर धाकच नाही?

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालय हे अतिशय नावाजलेले व गुणवत्तापूर्व शिक्षणासाठी ओळखले जात होते मात्र मागील एक-दोन वर्षापासून या महाविद्यालयातील प्राचार्य,उपप्राचार्य,प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी यांच्या दुर्लक्षेतेमुळे या महाविद्यालयाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. राजमाता जिजाऊ महाविद्यालय हे तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी एकमेव शासकीय महाविद्यालय आहे हे महाविद्यालय गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी ओळखले जात होते परंतु मागील एक दोन वर्षांमध्ये येतील प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांच्या दुर्लक्षेतेमुळे महाविद्यालयाच्या गुणवत्ता ढासळली असून प्राध्यापक महाविद्यालयात कमी आणि हॉटेलवर गप्पा मारण्यात जास्त व्यस्त असतात कार्यालयीन कर्मचारी कार्यालयीन वेळात स्वतःच्या घरगुती कामात व्यस्त असतात कार्यालयात येऊन सोशल मीडियावर वेळ घालवण्यात व्यस्त असतात

▶▶ उर्वरित पान २ वर

# खरे मित्रप्रेम त्यागात !

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी राष्ट्रीय मैत्री दिन देशभरात साजरा केला जातो. भारतात बहुतांश शाळा महाविद्यालये, कार्यालये यांना रविवारी सुट्टी असल्याने हा दिवस आदल्या दिवशी शनिवारी किंवा दुसऱ्या दिवशी सोमवारी साजरा केला जातो. दरवर्षी भारतात उत्साहाने साजरा करण्यात येणाऱ्या 'फ्रेंडशिप डे'ला तसा कोणताही ऐतिहासिक आधार नाही. पेरुग्वेमध्ये सुरु झालेला हा मैत्री दिन आज भारतातील गल्लीपासून दिल्लीपर्यंत पोहोचला आहे. अमेरिकेत १९३५ मध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी एका व्यक्तीची हत्या करण्यात आली होती.

खून झालेल्या व्यक्तीच्या जवळच्या मित्राला ही घटना कळताच त्यानेही निराशेने आत्महत्या केली. मित्रांमधील हे प्रेम पाहून अमेरिकन सरकारने ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर भारतासह इतर देशांमध्ये ऑगस्टच्या पहिल्या रविवारी फ्रेंडशिप डे साजरा केला जाऊ लागला. शालेय आणि महाविद्यालयीन तरुणांमध्ये या दिवसाची विशेष क्रेझ असते. हल्ली सर्वांच्याच हातात स्मार्टफोन आणि त्यात अनलिमिटेड इंटरनेट डाटा आल्याने सोशल



मीडियावर या विदेशी दिवसांचे भलतेच पेव फुटले आहे. मैत्रीचे नाते हे रक्ताचे नाते नसले तरी ते सर्व नात्याच्या पलीकडचे पण अत्यंत जिवाभावाचे असते. जीवनात एकतरी मित्र असावा ज्याच्याशी आपले सुख दुःख व्यक्त करता येईल,आपल्या भाव भावना, मनातील विचार त्याच्यासमोर प्रकट करता करता येतील, कठीण काळात तो आपला आधार बनून आपल्यासोबत उभा राहील. प्रसंगी आपल्याला योग्य सल्ला देईल आणि आपल्याकडून चूक झाल्यास ती परखडपणे आपल्याला सांगेल. आजमितीला स्मार्ट फोनच्या दुनियेत मैत्रीच्या व्याख्या बदलू लागल्या आहेत. फेसबुकवर आणि इंस्टाग्रामवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स असणे याला मैत्री म्हणावे का ? आपल्यावर कठीण प्रसंग ओढावल्यावर सामाजिक माध्यमांवरील किती मित्र आपल्या मदतीला धावून येतील. मित्रत्वाचे नाते केवळ मनगटावर रिबिनी बांधून, पेनाने नावे लिहून आणि सोशल मीडियावर शुभेच्छा देऊन व्यक्त करता येत नाही. त्यामागे असावी लागते ती त्यागाची भावना. कुठूनतरी परदेशातून आलेले फॅड चालवून एक दिवस आपले मित्रप्रेम सार्वजनिकरित्या प्रकट करण्याऐवजी या देशाच्या मातीत घडून गेलेल्या अपार मित्रप्रेमाच्या आणि त्यासाठी केलेल्या त्यागाच्या कथा आज शाळा महाविद्यालयांतून विद्यार्थी मनावर बिंबवायला हव्यात. सुदामासाठी आपले सारे वैभव लुटवू पाहणारा श्रीकृष्ण, शिवरायांच्या हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या लढ्यात प्राणाची बाजी लावून लढलेले सवंगडी मावळे, संभाजी महाराजांची शेवटच्या श्वासापर्यंत साथ न सोडणारे मित्र कवि कलश अशी एक ना अनेक उदाहरणे या भारत भूमित घडली आहेत. ज्यांच्या मित्रप्रेमाच्या कथा आजही प्रेरणादायी आहेत. या कथा आणि त्यामागील त्यागाची भावना आजच्या पिढीमध्ये रुजवायला हवी म्हणजे मित्रप्रेम हे एक दिवसापुरते सीमित नसते हे त्यांनाही कळेल.

**– जगन घाणेकर.**

## श्रावणात उपवास करताय? पण डायबिटिस आहे? काय खाल अन् काय टाळाल एकदा बघाच

श्रावण महिना सुरू झाला आहे आणि या पवित्र महिन्यात शनिवार आणि सोमवारचा उपवास करण्याची परंपरा आहे. आरोग्याच्या दृष्टिकोनातून उपवास चांगला मानला जातो, परंतु प्रत्येकाचे आरोग्य त्यावर लागू होत नाही. उदाहरणार्थ, काही गंभीर आजार असलेल्या लोकांना उपवास करणे सोपे नसते. तसेच मधुमेहाच्या रुग्णांबद्दल बोललो तर उपवास केल्याने त्यांची साखर असंतुलित होऊ शकते. याशिवाय उपवासाच्या वेळी खाल्लेल्या अनेक गोष्टी त्यांच्या साखरेच्या पातळीसाठी देखील योग्य नसतात. अशा परिस्थितीत, श्रावणी शनिवारी मधुमेहाच्या रुग्णांनी उपवास ठेवणे योग्य आहे का हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे ? जर हो, तर उपवासाच्या वेळी त्यांच्या आहारात कोणत्या गोष्टींचा समावेश करता येईल.

सर्व मधुमेहाच्या रुग्णांनी उपवास ठेवू नये. याचा त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो आणि तो घातक देखील ठरू शकतो. इन्सुलिन घेणाऱ्या मधुमेहाच्या रुग्णांनी उपवास टाळावा. लक्षात ठेवा, जर तुम्ही इन्सुलिन घेत असाल आणि तरीही उपवास करत असाल तर त्याचा तुमच्या किडनीवर वाईट परिणाम होऊ शकतो. याशिवाय, बीपी असलेल्या मधुमेही रुग्णांनीही उपवास टाळावा. जर तुम्हाला कोणत्याही विशेष स्थितीत उपवास करायचा असेल तर एकदा डॉक्टरांशी बोलणे चांगले. मधुमेहाचे रुग्ण कोणते उपवास करू शकतात हा प्रश्न आहे, तर त्यात मेटफॉर्मिन किंवा ग्लिप्टिन गटाची औषधे घेणारे लोक समाविष्ट आहेत. खरं तर, या औषधांनी हायपोग्लाइसेमियाचा धोका कमी होतो.

मधुमेहाच्या रुग्णांनी उपवास करताना काय खावे

प्रथिनेयुक्त आहार– मधुमेहाचे रुग्ण उपवास करत असले तरी त्यांनी त्यांच्या आहाराबद्दल निष्काळजी राहू नये. असे केल्याने त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी बिघडू शकते, ज्याचा त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. तुमच्यासोबत असे होऊ नये म्हणून, वेळोवेळी काहीतरी खात राहा. तुमच्या आहारात प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करा. त्यात चीज, कॉटेज, दही इत्यादींचा समावेश असू शकतो.

कमी ग्लायसेमिक फळे खा– जर तुम्ही श्रावणी शनिवारचा उपवास करत असाल तर तुमच्या आहारात ग्लायसेमिक फळे समाविष्ट करायला विसरू नका. त्यात स्ट्रॉबेरी, रास्पबेरी, सफरचंद इत्यादींचा समावेश आहे. ही फळे खाल्ल्याने तुमच्या रक्तातील साखरेवर कमीत कमी परिणाम होतो. याचा अर्थ असा की ते खाल्ल्यानंतरही तुमच्या रक्तातील साखरेची पातळी खराब होत नाही.

शरीर हायड्रेट ठेवण्यास विसरू नका– श्रावण महिन्यात भरपूर पाऊस पडतो, ज्यामुळे लोक अनेकदा कमी पाणी पितात. कारण त्यांना कमी तहान लागते. परंतु, उपवासाच्या वेळी तुम्ही पुरेसे पाणी पिणे आणि स्वतःला हायड्रेट ठेवणे महत्वाचे आहे. तथापि, तुम्ही स्वतःला हायड्रेटेड ठेवण्यासाठी इतर पर्याय निवडू शकता, ज्यामध्ये नारळ पाणी किंवा हर्बल टीचा समावेश आहे.

मधुमेहाचा रुग्ण उपवास ठेवू शकतो का ?– मधुमेहाचा रुग्ण उपवास ठेवू शकतो पण जास्त वेळ उपाशी राहणे योग्य नाही कारण त्यामुळे साखरेचे प्रमाण वाढण्याचा धोका वाढतो. या उपवासातही दर काही तासांनी काहीतरी खात आणि पित राहा.

भूक लागल्याने साखर वाढते का ?– चयापचय मंदावल्याने उपाशी राहिल्याने साखर वाढते, ज्यामुळे ग्लुकोज लवकर पचत नाही आणि शरीरातील साखरेची पातळी वाढत राहते.

उपवास करताना मधुमेहाच्या रुग्णांनी कोणता रस प्यावा ?– मधुमेहाचे रुग्ण उपवास करताना काकडी आणि डाळिंबाचा रस पिऊ शकतात. रसाऐवजी फळे खाणे हा एक चांगला पर्याय आहे. यामुळे शरीराला अधिक फायदा होईल.

## प्रेम

दहा वर्षांनी दोघे समोरासमोर आली,
अचानक एकमेकांची भेट आज झाली
तिला पाहताच त्याचा राग उफाळून आला
खरेच प्रेम होते माझ्यावर की देखावा होता केला
विरहाचे चटके दिसत नाहीत मनावर
पहिल्यापेक्षा आनंदाचे भाव होते तिच्या चेहऱ्यावर
भांडण छोटेसे तरी दहा वर्षे राहिली
ना मेसेज ना एक फोन ती करू शकली
फसवे होते प्रेम तिचे म्हणूनच खुश दिसतेय
इतक्या वर्षांनी भेटूनही सारखी हसतेय
मनातला राग लपवत त्याने तिला विचारले 'कशी आहेस ?'
'पुस्तकात ठेवलेल्या पर्णाची जाळी व्हावी अगदी तशीच आहे.'
त्याने तिला विचारले 'कुठे रहातेस ?'
'माणसांच्या गर्दीतून लांब वेगळ्याच जगात वास्तव्य करते.'
त्याने तिला विचारले 'घरचे सर्व कसे आहेत ?'
'सर्वजण ठीक मीच त्यांच्यापासून लांब आहे.'
ठीक आहे म्हणून तो तेथून होता निघाला
थांब ना, जरा म्हणत तिने त्याला थांबवला
भेटला आहेस, तर चल माझ्या घरी जाऊ
गप्पा–गोष्टी करत रस्त्याने थोडा वेळ एकत्र चालू
खरे तर प्रचंड चीड आली होती त्याला
गळा दाबून आताच ठार करावे तिला
छोट्याशा भांडणाने सोडून गेली मला
दहा वर्षांच्या काळात कधीच आठवलो नाही का मी तिला ?
दाबून विचार मनातले तिच्यासंगे चालू लागला
चालता चालता एका अनोळखी वाटेवर येऊन पोहोचला
त्याला पाहून हसून ती म्हणाली दमला असशील तर थोडा आराम कर
थोडीशी ताकद पुन्हा नव्याने पायात भर
हसणे तिचे पाहून मनात त्याच्या आले
काही वर्षांपूर्वी याच हसूने तिच्या प्रेमात मला पाडले
थोड्याच वेळात ती म्हणाली चल आता चालूया
जवळच आहे घर माझे आराम बाजूला सारुया
उठून चालताना त्याला दूरवर कुठेच घरे नाही दिसली
कशावरून हिला घर जवळ आल्याची चाहूल लागली
आले माझे घर म्हणत ती तिथेच थांबली
आत नको येऊ तू तुझ्यासाठी ही जागा नाही चांगली
कुठे आहे घर ? हे कुठले ठिकाण ?
सर्वत्र दिसतेय चिता जाळणारे स्मशान
दहा वर्षे झाली एका अपघाताने श्वास माझा संपला
निर्जीव देहाला लोकांनी इथेच आणून जाळला
जूने घर सुटले नाते सर्वांशी तुटले
तेव्हापासून इथेच माझे नवीन घर मी थाटले
शेवटच्या श्वासाला इच्छा होती एकच माझी
भांडण आपले मिटून भेट व्हावी तुझी
म्हणूनच वेड्या वाट तुझी पाहात होते
इकडे–तिकडे भटकत फक्त तुलाच तर शोधत होते
छोटेशे भांडण पर्णाच्या जाळीसारखी जपले
म्हणूच लोकांच्या गर्दीतून लांब वास्तव्यास आले
तू येशील कधीतरी म्हणून डोळे वाटेकडे लावले
पाहून आज तुला माझी मीच धन्य झाले
आज तू भेटलास माझी झाली इच्छापूर्ती
तुला भेटून आज मिळाली मला खरी मुक्ती
बोलता बोलता तिचे डोळे होते पाणावले
आत्म्यानेही रडावे इतके प्रेम तिने होते केले
गैरसमज होता जो आज त्याचा संपला
फसवे प्रेम नव्हते तिचे दोष तिच्यावरचा मिटला
अपघाताने तिचा जीव होता घेतला
म्हणूनच इतकी वर्षे ना फोन ना मेसेज तिचा भेटला
ऐकून सर्व तिचे तो जागीच कोसळला
न संपणारा पूर डोळ्यांतून ओसंडून वाहू लागला
इतक्या वर्षांनी आज ती दोघे भेटली
आत्मा बनूनही ती त्याच्यासाठी दहा वर्षे होती थांबली

**– कु. ज्योती रावराणे.**

◆ पान १ वरून पुढे...

### न्याय मिळणारच...

बसले होते. यावेळी मुंडे कुटूंबियांतील भगिनी, प्रा. शिवराज बांगर, बाळा बांगर, राजाभाऊ फड, आ. संदीप भैय्या क्षीरसागर आदिंची भाषणे झाली. परळीकरांनी टेंन्शन घेऊ नका पण चुका सुधारा तुम्ही संधी दिल्यामुळे यांच फावल, महादेव मुंडे यांच्या कुटुंबाल शंभर टक्के न्याय मिळवून देणार असा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी महादेव मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी आयोजित शुक्रवारी (दि. १) शहरातील सर्व पक्षीय, जाती धर्माची बैठकीत बोलताना दिला. यावेळी संतोष देशमुख आणि महादेव मुडे कुटूंबियांची प्रमुख उपस्थिती होती. फिग्मी एजंट महादेव मुंडेयांची २१ महिन्यांपूर्वी अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. प्रथम यास अपघात दाखविण्याचा प्रयत्न झाला पण कुटुंबाने घातपाताचा संशय व्यक्त केल्याने अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला, पण २१ मी महिने उलटून गेले तरी आरोपी मोकाट आहेत. या आरोपींना पकडून न्याय द्यावा अशी मागणी करीत आहे. स्व. महादेव मुंडे हत्या प्रकरणात तपासाला वेग आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार संशयितांची चौकशी केली आहे. एक पथक मुंबईकडे गेलेले आहे तर एक पथक बीड जिल्ह्यात तपास करत आहे. दरम्यान याप्रकरणात आ. रोहित पवार यांनी फेसबुक पोस्ट करून चार आरोपी पकडल्याचे सांगितले आहे. मात्र बीड जिल्हा पोलिसांनी हा तपासाचा भाग असल्याचे सांगितले. मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेशरी मुंडे यांनी अनेक आंदोलन केले. कालच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

◆ पान १ वरून पुढे...

घेऊन सर्व हकीकत सांगितली यानंतर मुख्यमंत्र्यांनी या खून प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करून यासाठी पंकज कुमावत यांची प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. यानंतर आता मुंडे कुटुंबाला न्याय देण्यासाठी आज रामकृष्ण लॉन्स येथे सर्वपक्षीय व सर्व धर्मियांची व्यापक बैठक घेण्यात आली. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील बोलताना म्हणाले लाभार्थी टोळी नीट करणार असून त्यांना आता सुट्टी नाही. यांची माज आणि मस्ती संपवणार आहे. तर बहीण–भावाशी आपला काहीच वाद नाही. पण त्यांनी चेलेचपाटे नीट ठेवा म्हणालो पण त्यांनी ऐकले नाही. यामुळे ही लाभार्थी टोळी सोडणार नाही. कुटुंबात दुःख असताना तुम्ही मंत्री पद कशाला मागता आरं गरिबाचे घर उघड्यावर आली, बहीणीचे कपाळ पांढरे झाले लेकरं उघडे पडली लाथ मारा अशा पदावर, तर ज्ञानेश्वरी ताईंनी दिलेली सर्व नावे ते आरोपी अटक करावीत, कोणावर अन्याय झाला तर पुढे या मी आहे तुझ्यासोबत, यांना आता सरळ करणार असून, मराठा, मुस्लिम आणि दलित शोशितांसाठी काम करणार असून लाभार्थी टोळीला सोडणार नाही. मराठ्यांचा वादा असून, मुंडे कुटुंबाला शंभर टक्के न्याय मिळवून देणार असा विश्वास व्यक्त केला. यावेळी अनेक मान्यवरांची भाषणे झाली. खा. बजरंग सोनवणे, आ. संदीप क्षीरसागर, आ. प्रकाश सोळंके, माजी आ. सय्यद सलीम, धनंजय देशमुख, प्रभाकर कोलांगडे, राजेभाऊ फड, बाळा बांगर यांच्यासह सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी आणि जाती धर्माचे नागरीक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

◆ पान १ वरून पुढे...

### शिवशाही बसच्या...

झाली होती. मृत रिक्षाचालकाचे नाव श्रीनिवास शिवाजी राठोड (वय २३, रा. पांगरी तांडा) असे आहे. त्यांनी रिक्षातून काही प्रवाशांना कामाच्या ठिकाणी सोडल्यानंतर पांगरी रोडने तांड्याकडे परतत असताना शिवशाही बसने ( एमएच ०४ एफएल ०९८८ ) त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षा काही अंतर फरफटत गेल्याने श्रीनिवास राठोड यांचा जागीच मृत्यू झाला.

### शिवाईनगरी...

चोरट्यांनी घरातील दीड तोळे सोने व मुलाच्या हातातील दोन कडे चांदीचे तसेच शिलाई मशीन चोरट्याने चोरून नेली. भगवान राठोड शिक्षक यांच्या घरी अडीच तोळे सोने व नगदी दीड लाख रुपये चोरट्यांनी नेले. धुमक यांचेही घर फोडले मात्र घरातील काय केले हे समजू शकले नाही हे किरादार असल्याने कामानिमित्त बाहेर गेल्याने माहिती मिळताच लंके साहेब यांनी शिवाईनगर येथे सकाळी बघितले व नागरिकांना धीर दिला.

### नीता अंधारे...

यावी तसेच त्यांच्या कार्य काळामध्ये नगरपालिकेच्या माध्यमातून केला जाणारा विकास पूर्णपणे का ठप्प झाला होता याची कारणे जनतेपुढे

◆ पान १ वरून पुढे...

आली पाहिजेत. नीताताई अंधारे यांच्या डोक्यावर कोणा कोणाचा हात होता व त्यांची कोणत्या राजकीय पुढार्यांची सांठ–गाठ होती हेही उजेडात येण्याची गरज आहे. अंधारे यांच्या काळामध्ये आलेले निधी व नगरपालिके कडे जमा होणारा वसुलीचा पैसा हा कोणाच्या सांगण्यावरून कशा पद्धतीने वापरण्यात येत होता हेही जनतेपुढे येणे तितकेच गरजेचे आहे. येणारे नवीन मुख्याधिकारी लवकरच नगरपालिकेचा कार्यभार हाती घेतील व त्यांच्याकडून चांगला कारभार होईल अशी अपेक्षा आपण सर्वजण सर्व स्तरातून मिळून बीडची जनता म्हणून नवीन येणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांकडून करत आहोत.बीड शहराच्या व बीड नगरपालिकेच्या दुर्दशेविषयी तसेच शहरातील दयनीय परिस्थिती विषयी येणाऱ्या नवीन मुख्याधिकाऱ्यांना बीड शहर बचाव मंच अवगत करून दिल्याशिवाय राहणार नाही.

### प्राध्यापक, कर्मचारी...

कार्यालयीन कर्मचारीवर प्राचार्य उपप्राचार्य यांचे दुर्लक्ष झाले असून त्यांच्यावर प्राचार्याचा कुठलाही धाक राहिलेला नाही यामुळे येतील रेगुलर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये घट होत असून हे विद्यार्थी खाजगी क्लासेस तसेच इतर महाविद्यालयाला जास्त पसंती देत आहेत असेच सुरू राहिल तर महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येवर याचे परिणाम होऊ शकतात. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी वेळीच प्राध्यापकांना समज देऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीकडे लक्ष देण्याची गरज आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### परळीत दहशत...

एसआयटी स्थापन केली पण त्याची ऑर्डर येईपर्यंत त्यांचे काही खरे मानू नका. एसआयटीमध्ये पंकज कुमावत आले तर दूध का दूध, पाणी का पाणी होईल. दरम्यान, कालपासून महादेव मुंडे प्रकरणात काही आरोपींना अटक झाल्याचे सांगितले जात आहे. परंतु कोणालाही अजून अटक झाली नाही. पोलीस यंत्रणाच अशी अफवा पसरवित असावी. परळीतील पोलीस गेंड्याचे कातडे पांघरून फिरत आहेत. केवळ पोलीस अधिक्षक आणि जिल्हाधिकारी बदलून चालणार नाही तर खालची यंत्रणा देखील बदलली पाहिजे. आज सुद्धा परळीची टोळी सक्रिय आहे. जेलमध्ये देखील त्यांना सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. बीडचा खासदार म्हणून मी कायम या लढ्यात सोबत आहे. मनोज जरांगे पाटील हे देतील तो आदेश पाळून आम्ही काम करू, असा शब्दही बजरंग सोनवणे यांनी दिला.

### धुनकेश्वर श्रावण...

यांचे होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक–भक्तांनी या हरिकिर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान केशव इंद्रसेन मुंडे, शिवाजी काशिनाथ यादव, अच्युत त्रिंबक कागणे, शिवाजी रामा गावडे, जगदीश बंकटी गोरे,गोवर्धन अरुण यादव, सुंदर साहेबराव भोसले, राम दशरथ यादव, बालासाहेब रामा काळे, बापू महादेव रोटे, विजय अंबादास खेरमोडे, दत्ता विष्णू यादव,नितीन बाबू जावळे, महादेव सटवा कागणे, अनिल शंभू काजळे, दिनकर सदाशिव मुंडे, नवनाथ प्रभाकर गावडे,कचरू रावसाहेब गावडे, राजेभाऊ अंबादास खैरमोडे, अशोक बाबासाहेब भोसले, बालासाहेब यशवंत देशमाने, धनंजय अशोक यादव, सुदाम रावसाहेब गावडे,रामेश्वर ईराप्पा यादव, नारायण अप्पाराव यादव, श्रीकिसन सोपान कागणे,बारीकराव धोंडीबा बिल्पे, गोरख सदाशिव बोडके, ज्ञानेश्वर गंगाधर राऊत, राम बबन धरपडे, मच्छिंद्र गोविंदराव गावडे, शंकर सटवा काजळे, दत्ता अर्जुन अंडील, हनुमान नवनाथ गायके,सर्वेश संतोष कचरे, मुंजाबा अर्जुन यादव यांच्यासह धुनकेश्वर श्रावण

◆ पान ४ वरून पुढे...

महोत्सव समिती व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पंतप्रधान आवास...

लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप करताना मनस्वी आनंद होत आहे. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे अंबाजोगाई नगर पालिका लोकांपर्यंत योजनेचे लाभ पोहोंचविण्यात यशस्वी ठरली. विकासनिधीची कमतरता पडणार नाही– यापूर्वीच्या काळात लोकहिताच्या योजनांचे लाभ नगर परिषदेमार्फत गरजूंपर्यंत व्यवस्थित पोहोंचत नव्हते. मात्र, आता माझे सर्व बाबींवर बारकाईने लक्ष आहे. मागील काही काळात अंबाजोगाई शहरासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे शहरात अतिशय वेगाने विकासात्मक बदल सुरु असून शहराचा चेहरामोहरा बदलतो आहे. लोकहिताच्या दृष्टीने नगर पालिकेला निधीची कमतरता पडू देणार नाही असा विश्वास आ. मुंदडा यांनी याप्रसंगी नागरिकांना दिला. या कार्यक्रमात ६६ लाभार्थ्यांना घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजप केज विधानसभा अध्यक्ष शरद इंगळे, शहराध्यक्ष संजय गंभिरे, प्रशांत आदनाक, अनंत अरसुडे, शिरीष मुकडे, अजय राठोड, गोपाळ मस्के यांच्यासह नगर परिषद अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### ॲड. निळकंठ ...

जिद्द, कार्यतत्परता या गुणामुळे आपण नेत्रदिपक प्रगती केली आहे. आपल्या मित्र परिवाराला तुम्ही एक मजबुत आधारस्तंभ लाभलाआहात .आयुष्यातले सगळे क्षण आठवणीत राहतात अस नाही. पण काही क्षण असे असतात जे विसरु म्हणताही विसरता येत नाहीत. हा वाढदिवस म्हणजे त्या अंनत क्षणातला असाच एक क्षण.. हा क्षण मनाला एक वेगळ समाधान देईलच. पण.. आमच्या शुभेच्छनी वाढदिवसाचा हा क्षण एक 'सण होऊ दे हिच सदिच्छा..! वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देताना अँड गहिनीनाथ केकान सर, अँड दिपक खाडे सर अँड दिपक रोटे सर, शंशाक धन्वे,सुनिल

◆ पान ४ वरून पुढे...

बिवरे सर,शेख शरिफ भाई,वराटसर ,नंदु जाधव,सामाजिक कार्यकर्ते तथा लोकशाही पत्रकार संघाचे बीड शहर उपाध्यक्ष अशोक दादा ढोले पाटील ,सौरभ मुंडे,सह आदी मान्यवरांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला.

### अण्णाभाऊ साठे....

मुन्ना गायकवाड, संजय वाघमारे, पांडुरंग सुतार, विशाल मोरे आदी उपस्थित होते. तसेच, कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी शहरातील रामतीर्थ परिसरातील अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी गोरख मोमीन, विशाल बोबडे, सागर पाटोळे, निलेश लोंढे, नितीन आरे, विजय रोकडे, अशोक धुताडमाल, संगीता बाबरे, संजीवणी कानडे, संगीता कांबळे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

### विद्यार्थ्यांना शालेय...

निरीक्षक पोलीस मुख्यालय बीड पी.पी.दलाई,संतोष जायभाय,दै. वादळवार्ताचे कार्यकारी संपादक बालाजी जगतकर, सुजाता सावंत,दैनिक दिव्यलोक भूमीचे केशव मुंडे, न्यू २३ मराठीचे संपादक गणेश शिंदे,संपादक युवादर्पण लाईव्हचे राजेंद्र तिडके, संतोष जायभाय,सविता जैन,रवि धोंडगे मुख्याध्यापक सुमित जोगदंड, कार्यक्रमाच्या आयोजक समाजसेविका सीमा ओस्तवाल यांची उपस्थिती लाभली होती. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात खवचट सर यांनी केले तर शाळा आणि सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून आजवर राबवण्यात आलेल्या उपक्रमांचा ओघवता आढावा घेतला. तर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी सभापती तथा नगरसेविका जयश्री विलास विधाते यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकत पौराणिक काळ ते स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृश्यतेच्या जोखडात अडकलेला एकलव्याला धनुर्विद्या नाकारणारा गुरु द्रोणाचार्य तर स्वातंत्र्यपूर्व काळात स्पृश्य अस्पृश्यतेची जाणीव करुन

◆ पान ४ वरून पुढे...

देत छडी फेकुन मारणारा शिक्षक ते आज प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा अधिकार आहे आणि तो त्यांना मिळवून देण्यासाठी तांडा वाडी वस्ती झोपडपट्टी ते गाव कुसाबाहेर शाळा प्रवेशासाठी उपेक्षित वंचीत दीन दुबळ्याच्या लेकरांना प्रेरित करणारा जि.प.चा आजचा शिक्षक हे परिवर्तन म्हणजे जग बदल घालून घाव, सांगून गेले मज भीमराव. या आण्णाभाऊंच्या लेखणीची ताकद आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या आयोजक समाजसेविका सीमा ओस्तवाल यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधत त्यांना बोलक केल. मोबाईल पासुन दुर रहा, चांगला अभ्यास करा. आणि मोठे व्हा.आपली ओळख आपल्या कामाच्या माध्यमातून झाली पाहिजे असे काम करा अशा शुभेच्छा दिल्या. उषा लोंढे यांनी प्रत्येक शाळेत महापुरुषांचे फोटो असायला पाहिजेत त्याच बरोबर प्रत्येक महापुरुषाची जयंती साजरी केली पाहीजे. त्यांचे जीवन चरित्र विद्यार्थ्यांना उलगडून सांगीतले पाहिजे अशी आपेक्षा व्यक्त केली. मैना बोराडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून शाळेला ई–क्लास रुम मिळावी यासाठी प्रयत्नशील असल्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमात कें.प्रा. शाळा पोलीस कॉलनी, कें. प्रा.शाळा इंदिरानगर, कें. प्रा. शाळा धोंडीपुरा. कें. प्रा. शाळा शाहुनगर बीड या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, ईरेझर, शार्पनर अशा शैक्षणिक साहित्य वाटण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बालमित्र मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

### खुनाच्या गुन्ह्यातील...


गैर प्रकारे वागत असून शिव्या देणे, मारहाणीच्या धमक्या देतो त्याच बरोबर क्लब चालवतो अशी तक्रार तलवाडा पोलिस स्टेशन ला दिली असून मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरील प्रकरणाचा निकाल लागत नाही तो पर्यंत गाव बंदी करण्यात यावी असे दिलेल्या तक्रारीत मानले आहे. त्यामुळे आता पोलिस प्रशासन काय कार्यवाही करते याकडे लक्ष लागले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

## साहित्य दिंडी, घोषणांचा गजर, अन् सांस्कृतिक परिवर्तनाची सुरुवात ; बीडच्या आण्णाभाऊ साठे जयंतीने राज्याला आदर्श घालून दिला









### • पाचशे महिलांना साड्या वाटप!

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक समतेचे आणि श्रमिक सन्मानाचे प्रतीक ठरलेल्या या दिवशी, शहरातील कष्टकरी, कामगार महिलांना साडी वाटप करून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

### • मंजुषा शिंदेंच्या सूरांनी जागवली समतेची जाणीव!

आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित संगीत रजनीत ख्यातनाम गायिका मंजुषा शिंदे यांनी आंबेडकरी चळवळीची मूल्यं, समता, बंधुता आणि न्यायाचे गीतरूप सादर केले. त्यांच्या सादरीकरणातून समाज परिवर्तनाचा संदेश जोरकसपणे उमटला. आंबेडकरी सांस्कृतिक आंदोलनाला स्वरांची ताकद लाभली, अशी भावना उपस्थितांमध्ये उमटली.

### • संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांचा जन्मदिन संयुक्त महाराष्ट्र चळवळ दिन म्हणून साजरा करावा, यासाठी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता स्वाक्षरी मोहीम सुरु करुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले जाणार आहे. आशा माहितीचा उपक्रम साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे गौरव समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राबविण्यात येत आहे.

### • साहित्य रथातून झळकली...

साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त निघालेल्या साहित्य दिंडीत सजविण्यात आलेल्या साहित्य रथाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. 'फकिरा' कादंबरीसह अण्णाभाऊंच्या अन्य ग्रंथरचनांनी रथाची साहित्यिक ओळख अधोरेखित केली, तर पृथ्वी ही श्रमिकांच्या हातावर तरलेली आहे हा संदेश सादरीकरणातून प्रभावीपणे पोहोचवण्यात आला. याचबरोबर कर्नाटक वाद्यांच्या सादरीकरणामुळे या दिंडीला सांस्कृतिक वैशिष्ट्याची लय मिळाली. लोकशाहीर अण्णाभाऊंच्या विचारांची झलक आणि श्रमिकांचे प्रतिनिधित्व करणारी कलात्मक मांडणी ही या रथाची खरी ओळख ठरली.

**बीड । प्रतिनिधी**

शहरात साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती शुक्रवार (दि.१)ऑगस्ट रोजी अतिशय उत्स्फूर्तपणे परिवर्तनाने साजरी करण्यात आली. सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने चांदणे वाडा येथून आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य साहित्य दिंडी काढण्यात आली होती. या दिंडीत महिला आणि पुरुष पांढऱ्या शुभ्र पारंपरिक वेशात सहभागी झाले होते. कर्नाटक राज्यातील पारंपरिक वाद्य वादनाने आणि घोषणांनी संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले. पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून उपस्थित लाखो जनतेने आण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करत त्यांचे विचार स्मरणात ठेवले.

बीड शहरात सार्वजनिक जयंती उत्सव समितीमार्फत दि.२८ जुलै ते १ ऑगस्ट दरम्यान आण्णाभाऊ साठे यांचे विचार आणि कार्य लोकांपर्यंत पोहोचवणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.या संपूर्ण महोत्सवाचे म ार्गदर्शक अजिंक्य चांदणे, उत्सव समितीचे अध्यक्ष बळीराम गवते आणि सचिव सुनिल पाटोळे यांनी अत्यंत नियोजनबद्ध आणि प्रेरणादायी आयोजन केले होते. सार्वजनिक जयंती उत्सव समि तीकडून आयोजित अभिवादन कार्यक्रमास मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, आ.संदिप क्षीरसागर, अनिल जगताप, कल्याण आखाडे, उल्हास गिराम, राजेंद्र मस्के, सचिन मुळूक, फारुख पटेल, जयसिंग चुंगडे, अजय सरवदे, सिध्दार्थ शिनगारे, गोपाळ धांडे, प्रेमलताताई चांदणे, उत्तम पवार, अशोक सोनवणे, सुभाष लोणके, यांच्यासह लाखो जनसमुदाय उसळला होता. दरम्यान सायंकाळी बीड शहरातील विविध जयंती उत्सव समित्यांकडून साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिम ेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.

# पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी विद्यालयात साहित्य सम्राट आणाभाऊ साठेंची जयंती व लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी साजरी

**पोलवंडी । प्रतिनिधी**



पिंपळवाडी हायस्कूल विद्यालयात साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली प्रथम या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप सर तसेच प्रमुख पाहुणे गजानन बँकेचे संचालक श्री अर्जुन दादा बहिरवाळ तसेच मधुकर अण्णा पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. गावातील प्रतिष्ठित नागरिक , सर्व शिक्षक यांनी अभिवादन केले. शाळेतील माजी विद्यार्थी श्री विशाल संभाजी पाटील आणि प्रतीक भीमराव निकाळजे या दोघांचा विद्युत महामंडळात सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल शाळेचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री प्रदीप जगताप आणि प्रमुख पाहुणे श्री. अर्जुन दादा बहिरवाळ* यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी श्री मधुकर पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी किती मोठे कष्ट सहन करतात. तसेच माजी सरपंच अर्जुन दादा बहिरवाळ यांनी आजच्या विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पासून प्रेरणा घेणे आवश्यक आहे असे सांगितले. शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या कष्टाची जाणीव ठेवून आपल्यामध्ये प्रगती घडून आणणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. तसेच आजचे सत्कार सत्कारमूर्ती श्री विशाल संभाजी पाटील आणि श्री प्रतीक भीमराव निकाळजे या दोघांनी आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार केले. तशाच प्रकारे सर्व विद्यार्थ्यांनी आपले ध्येय ठरवून आपल्या जीवनाचे शिखर सर करणे गरजेचे आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नाईकवाडे सर यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री ढगे सर यांनी केले. श्री चौधरी सर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे आभार श्री खटाणे सर यांनी मानले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठ्या उत्साहाने सहकार्य केले या कार्यक्रमाची सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून शोभा वाढवली.



*बीड:साहित्यरत्न अणाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्ताने साहित्यरत्न अणाभाऊ साठे चौक बीड शहर या ठिकाणी जाऊन अभिवादन केले व भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय या ठिकाणी साहित्यरत्न अणाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे सर्व जिल्हा व शहर पदाधिकारी कार्यकर्ते*



*डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अणाभाऊ साठे यांची जयंती संयुक्तपणे करण्यात आली. यावेळी शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.आदिती उबाळे हिने केले तर शाळेचे मुख्याध्यापक श्री.रोहिदास डोंगरदिवे यांनी अध्यक्षीय भाषणात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि लोकशाहीर अणाभाऊ साठे यांचे विचार आणि कार्यावर प्रकाश टाकला.*

# अणाभाऊची लेखणी हा केवळ एक ऐतिहासिक ठेवा नसून ती एक क्रांतीची मशाल आहे: राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अणाभाऊ साठे याची लेखणी व त्यांचे साहित्य हे केवळ एक ऐतिहासिक ठेवा नसून ती एक क्रांतीची मशाल आहे असे परखड मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. ते लोकशाहीर अणाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अणाभाऊ साठे चौकात त्यांना अभिवादन करतांना बोलत होते.यावेळी राजकिशोर मोदी याच्यासोबत महादेव आदमाणे यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. जयंतीनिमित्त अभिवादन करतांना राजकिशोर मोदी पुढे म्हणाले की १ ऑगस्ट ही केवळ एक तारीख नाही, तर एका युगप्रवर्तक साहित्यिकाच्या जन्माची स्मृती आहे. या दिवशी शोषितांच्या वेदना लेखणीतून पेटवून, हजारो-लाखो दुःखी जीवांना आत्मभान देणारे एक 'लोकशाहीर' जन्मास आले. लोकशाहीर अणाभाऊ साठे हे दलित साहित्याचे जनक होते.त्यांनी तमाशा आणि लोकनाट्याच्या माध्यमातून क्रांतीचे अनेक गीत गायले. संपूर्ण जगाच्या साहित्य विश्वात आपला एक आगळावेगळा ठसा उमटवला. १९२० साली सांगली जिल्ह्यातल्या वटेगाव या खेडेगावात जन्मलेल्या अणाभाऊंचे बालपण हे अत्यंत उपेक्षेचे असेच गेले.

बालवयातच शिक्षणाचा मार्ग बंद झाल्याने मोलमजुरी करतांना त्यांना आयुष्याचा अस्सल अनुभव मिळाला आणि तेच वास्तव त्यांच्या लेखणीत झळकले असल्याचे मोदी यांनी याप्रसंगी नमूद केले. अणाभाऊ साठे यांनी लोक कलेसारख्या तमाशाला केवळ करमणुकीपुरते मर्यादित न ठेवता ते समाज जागृतीचे शस्त्र बनवले. त्यांच्या लेखणीचा प्रवास हा मानवाच्या आत्मसन्मनाचा प्रवास ठरल्या गेला आहे. अणाभाऊंच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांची ही ज्योत नव्या पिढीपर्यंत पोचवण्याचे आपले कर्तव्य असल्याचे राजकिशोर मोदी यांनी उपस्थित आपल्या सहकार्यांना सांगितले. अणाभाऊ साठे यांनी स्त्रीशक्तीच्या उत्थानासाठी, मजुरांच्या हक्कांसाठी आवाज उठवला. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी मुंबई गाठली. तिथे गेल्यावर त्यांनी बांधकाम मजूर, कामगार म्हणून काम केले. या कामातूनच त्यांना खऱ्या जीवनाची परीक्षा अनुभवयास मिळाली. या खडतर प्रवासातूनच त्यांच्या साहित्याला जीवन मिळाले. त्यांनी जीवनात जे अनुभवले तेच त्यांच्या साहित्यात अवतरले आहे अशी भावना देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. साहित्यरत्न अणाभाऊ साठे चौकामध्ये त्यांच्या चौकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करतांना बबन लोमटे, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, धम्मा सरवदे, अशोक देवकर, सुदाम देवकर, अंकुश हेडे, खलील जाफरी, अकबर पठाण, गोविंद पोतंगले,आकाश कऱ्हाड, उज्जेन बनसोडे, कैलास कांबळे, विशाल पोटभरे, रोहन कुरे,संतोष चिमणे, अमित परदेशी, रोहित साठे, शरद काळे, सिद्धार्थ साबळे, मुन्ना वेडे, मुनिर शाह, गुड्डू जोगदंड यांच्यासह अनेक जण सहभागी झाले होते.

# गजानन विद्यालयात साहित्यरत्न अणाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

**नवगण रा. । प्रतिनिधी**



येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर अणाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत पवळ हे होते. यावेळी प्रथम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न अणाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , स्थानिक गुन्हा शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड, ह .भ .प.अमृत स्वामी महाराज, संजय मचाले यांची उपस्थिती होती. याप्रसंगी शाळेतील सन २०२४-२५मधील इयत्ता दहावी व बारावी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी स्पर्धा परीक्षे बद्दल अनमोल असे मार्गदर्शन केले. पो.नि.बंटेवाड यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना क्यू आर कोड बद्दल सविस्तरपणे माहिती देऊन पोलीस प्रशासन विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी अहोरात्र सज्ज आहे असे सांगितले. अमृत स्वामी महाराजांनी आपल्या वाणीतून मंत्र मुग्ध केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रशांत पवळ यांनी साहित्यिक क्षेत्रात अणाभाऊ साठे यांचे खूप मोठे योगदान आहे. आणि लोकमान्य टिळक यांच्या जीवनाचा आदर्श घ्यावा व इच्छाशक्ती प्रबळ असेल तर माणूस यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले याशिवाय शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी अभिजीत खाडे, भागवत आघाव, शशिकांत पवार, मारुती वाघ, अजय ससाणे, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्यध्यापक शिंदे.एस.एस, पर्यवेक्षक दगडे.व्ही.एन यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदिप सरवदे यांनी केले तर श्रीमती दिवे मॅडम यांनी आभार मानले.


## जाहीर प्रगटन

**मा.श्रीमती. एस.डी.सोनी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ६३०/२०२५**

**नंदाबाई अभिमान कानडे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार - १. नंदाबाई भ्र. अभिमान कानडे, वय ५५ वर्षे, धंद घरकाम, रा. लक्ष्मीआई तांडा, नाळवंडी, ता. जि. बीड, २. देवगण पि. अभिमान कानडे, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, ३. करण पि. अभिमान कानडे, वय २७ वर्षे, धंदा - शेती, रा. सदर, ४. उमा भ्र. गोविंद गोंडे, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम, रा. जळगांव, ता. आष्टी, जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत अभिमान पि. साहेबराव कानडे, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत अभिमान पि. साहेबराव कानडे, यांचा मृत्यु दिनांक ११/०२/२०२२ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत अभिमान पि. साहेबराव कानडे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कोर्ट सदरहू अर्जदार कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत अभिमान पि. साहेबराव कानडे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०९/०९/२०२५ आहे.**

**(मार्फत ॲड. शेळके)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक अधिक्षक

दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**नवनाथ व ईतर विरुध्द निल.**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. १२१/२०२५**

अर्जदार :- १) नवनाथ पि. किसन शिंदे वय ६२ वर्षे, धंदा शेती, रा. गोमळवाडा, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) भिमराव पि. किसन शिंदे वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. सदर मो. नं. ९९२३८८४९७५., ३) मिरा भ्र. सदाशिव काकडे वय ४९ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. सदर., ४) शालनबाई भ्र. संजिवन लोंढे वय ५६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. कोळगाव, ता. गेवराई, जि. बीड, ५) इंदुबाई भ्र. सदाशिव गडर वय ५४ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. वडगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगन / आहिल्यानगर,

विरुध्द निल

**अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्यापेक्षा मयत नामे मथुराबाई भ्र. किसन शिंदे रा. गोमळवाडा, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. ०५/११/२०२३ रोजी मौजे गोमळवाडा, ता. शिरुर कासार, जि. बीड, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि२८/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारीख - ०९/०५/२०२५**

**(मार्फत- ॲड. एच. एस. कोळे)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)

क.लिपीक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, शिरूर कासार

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. ०२ ऑगस्ट २०२५ • पान ४

## थोडक्यात

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात ; विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश वाटप

**बीड । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमात महिला समृद्धी योजनेतील लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यात आले, तसेच दहावी, बारावी आणि पदवीधर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेशही वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाला समाजकल्याण सहाय्यक आयुक्त प्रदीप वेणू मुरलीधर भोगले आणि जात पडताळणी विभागाच्या संशोधन अधिकारी श्रावस्ती मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष नामदेव कुंटेवाड आणि गणेश महादेव पारवे यांनी केले, तर आभार प्रणिता रामचंद बोराळे यांनी मानले.

### 'SEED' योजनेसाठी 3 ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या वतीने डीएनटी, एनटी आणि एसएनटी सम ुदायातील विद्यार्थ्यांसाठी मोफत कोचिंगची 'SEED' योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://www.buddy4study.com/application/FCDNT-instruction या लिंकवर ३ ऑगस्टपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक डी. बी. क्षीरसागर यांनी केले आहे. या योजनेसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही अटी आहेत. यासाठी विद्यार्थी १२ वी उत्तीर्ण आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच, विद्यार्थी अन्य कोणत्याही सरकारी कोचिंग योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अधिक माहितीसाठी mosjebuddy-4study.com या ईमेलवर किंवा ८०४७४९५११८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

### धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त राजेंद्र महाराज वाघमारे यांचे किर्तन



**वडवणी । प्रतिनिधी**

धुनकवाड गावचे ग्रामदैवत धुनकेश्वर देवस्थान येथे गेल्या नऊ वर्षांपासून सुरू असलेल्या श्रावण सोमवार महोत्सवानिमित्त दुसरा सोमवार दि.४ ऑगस्ट २०२५ रोजी ११ते १ किर्तनसेवा राम ायणाचार्य ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे(गोंदीकर)यांचे किर्तन होणार आहे तरी या पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. धुनकवाड येथील धुनकेश्वर देवस्थानात गेल्या नऊ वर्षांपासून ह.भ.प.भागवताचार्य श्रीराम महाराज शेळके यांच्या प्रेरणेने सुरू असलेल्या श्रावण महोत्सवाचे प्रति वर्षाप्रमाणे या ही वर्षी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन चार सोमवारी नामवंत किर्तनकारांचे किर्तन होणार असुन पहिल्या श्रावण सोमवार दि.२८जुलै २०२५ रोजी भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज शेळके यांचे किर्तन झाले आहे. तर दुसऱ्या सोमवारची किर्तन सेवा ह.भ.प.राजेंद्र महाराज वाघमारे ▶ उर्वरित पान २ वर

### माजलगाव प्रतिष्ठान तर्फे 'संविधान जागर' कार्यक्रमाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत असते. याचाच एक भाग म्हणून संविधान जागर - संविधानच का हवे ? मनुस्मृती नको, संविधान हवे या विषयावर आधारित एक दिवसीय विचार मंथन चर्चासत्र रविवार दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित केले जाणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन माजलगाव विकास प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. सविस्तर वृत्त असे की,भारतीय संविधानाचे महत्त्व तसेच त्यातील मूलभूत तत्त्वे यांची जनतेमध्ये जाणीव निर्माण करणे हा या प्रकारच्या कार्यक्रमांचा मुख्य हेतू असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड पल्लवी सोळंके उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रात संध्या गोखले, संध्या म्हात्रे, सुजाता गोठोसकर, सुनीता बागल आणि डॉ. सविता शेटे यांसारख्या प्रतिष्ठित व्यक्ती सहभागी होणार आहेत. धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रधान समाज निर्मितीसाठी संविधान हे आपल्या जगण्याचा एक भाग झाले पाहिजे, असे आयोजकांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर सहभागाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. संविधानाचे महत्त्व आणि त्याच्या तरतुदींबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. अधिक माहितीसाठी सखाराम जोशी (९१५८३६३२२३), शोभा डाके (८४०८८ ८०८६४) किंवा डॉ. वरूणराज तौर (८३२९८ ४८२६४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



*विश्वश्रेष्ठ थोर साहित्यकार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त भिम स्वराज्य सेनेच्या वतीने त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या प्रसंगी भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष, तथा नगरसेवक ॲड विकास जोगदंड, पँथर संघटनेचे नेते माणिकराव वाघमारे, जेष्ठ नागरिक किसन तात्या जोगदंड, अप्पा तात्या जोगदंड,मंगेश जोगदंड,राजेशभाई कोकाटे,महादेव वंजारे, बालू इनकर,साहिल गायकवाड, आदर्शराजे जोगदंड, तेजस सांवत, करण मांजरे,कृष्णा माटे,सह आदी उपस्थित होते*

# परळीत दहशत माजविणारी मोठी टोळी अजूनही सक्रिय: खा.बजरंग सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**



परळीत महादेव मुंडे यांची हत्या होते परंतु २१ महिन्यात पोलीसांना आरोपी सापडत नाहीत. आरोपी पोलीसांच्या नाकावर टिच्चून परळीत फिरतात. हे कोणाच्या आशीर्वादाने चालते. परळीत ज्याला मारले त्यांच्यावरच खोटे गुन्हे दाखल केले जातात, त्यांनाच जेलमध्ये टाकले जाते. परळीत दहशत माजविणारी अजूनही मोठी टोळी बाहेर सक्रीय असल्याचा आरोप खा.बजरंग सोनवणे यांनी केला.

बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत महादेव मुंडे यांच्या कुटूंबियांना न्याय देण्याच्या लढ्याची दिशा ठरविण्यासाठी सर्वधर्मिय बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी आ.संदीप क्षीरसागर, आ.प्रकाश सोळंके, शिवसेना जिल्हाप्रमूख सचिन मुळूक, अनिल जगताप, बाळा बांगर, कुंडलिक खांडे, संतोष जाधव, हनुमान मुळीक, शेख शफीक, राजाभाऊ फड यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, महाराष्ट्रात जिथे अन्याय होतो, तिथे मनोज जरांगे पाटील आणि जिथे पाटील तिथे आम्ही उभा आहोत. आज महादेव मुंडे यांची पत्नी आपल्या सर्वांची ही बहीण २१ महिन्यापासून न्याय मागत आहे. त्यांच्या मागणीचा कोणी विचारत नाही. आज काही खून समोर आले आहेत. परंतु त्यांच्या मारेकऱ्यांना अटक होत नाही. मग मुख्यमंत्री काय करतात. परळीत तेच मारणार आणि तेच खोटे गुन्हे दाखल करत आहे. यामुळे कोणी तरी समोर येऊन बोलणे आवश्यक आहे. बाळा बांगर यांनी पुढे येऊन मांडणी केली आहे. काल मुख्यमंत्र्यांनी ▶ उर्वरित पान २ वर

## पंतप्रधान आवास योजनेतील 66 लाभार्थ्यांना
## आ. नमिता मुंदडांच्या हस्ते घरकुल प्रमाणपत्र वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अंबाजोगाईतील ६६ लाभार्थ्यांना घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. अंबाजोगाई नगर परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास लाभार्थ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार नमिता मुंदडा म्हणाल्या की, सर्वांना राहण्यासाठी हक्काचे घर मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पंतप्रधान आवास योजनेची सुरुवात झाली. सध्या या योजनेचा दुसरा टप्पा सुरु आहे. यापूर्वीच्या टप्प्यात अंबाजोगाई शहरातील ५११ लाभार्थ्यांना या योजनेतून तर १८३ लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेतून घरकुलांचे वाटप झाले. या वर्षी ६६ ▶ उर्वरित पान २ वर

**• योजनेपासून वंचित राहिलेल्यांनी लाभ घ्यावा**

**पंतप्रधान आवास योजना २०२९ पर्यंत सुरु राहणार आहे. अजूनही या योजनेच्या निकषात बसणाऱ्या कोणी व्यक्तींनी लाभ घेतलेला नसेल तर त्यांनी त्वरित प्रयत्न करावेत असे आवाहन आ. मुंदडा यांनी केले.**

## ॲड. निळकंठ बारगजे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



**बीड । प्रतिनिधी**

जिद्द ,चिकाटी आणि अभ्यासू वृत्तीने , आयुष्याच्या प्रत्येक वळणावर यशस्वी झालेले आमचें मार्गदर्शक बीड येथील प्रसिद्ध वकील निळकंठ बारगजे सर, आपला वाढदिवस साजरा झाला. आपणास वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!आपल्या कर्तृत्वाने आपण आपले वर्तमान, भविष्य निर्माण केलेत.त्याबद्दल आम्हाला आपला सार्थ अभिमान आहे. आपण आपल्या प्रेमळ व मितभाषी स्वभावाने अगणित मित्रपरिवार उभा केला आहे. सुख -दुःखाच्या प्रसंगी आपण सर्वांना आधार देण्यासाठी सतत आघडीवर असतात. आपला मनमिळावू स्वभाव, कामाची चिकाटी , ▶ उर्वरित पान २ वर



*साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिवादन केले, मीराताई नवले सोबत रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, राजाभाऊ हुरकुडे सह आदी.*

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त डॉ.क्षीरसागर दांपत्याकडून अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शहरातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहून डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिवादन केले.

शहरातील अर्धाकृती पुतळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पुष्पहार अर्पण अभिवादन केले. यावेळी नगरसेवक गणेश वाघमारे, विनोद हातागळे, गोपाळ धांडे, अमोल पौळ, स्वप्नील हातागळे, प्रकाश कानगावकर, अमर विद्यागार, नाना मस्के, संगीताताई वाघमारे, ▶ उर्वरित पान २ वर

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून गुरु आनंदच्या सीमा ओस्तवाल यांनी आण्णाभाऊंची जयंती साजरी केली : जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**



लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे, व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आणि प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जि.प.प्राथमिक शाळा पोलीस कॉलनी बीड येथे मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मैना बोराडे माजी उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद बीड. तसेच प्रमुख अतिथी म्हणून बीड नगरपालिकेच्या माजी सभापती तथा नगरसेविका जयश्री विलास विधाते शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र खेडकर, केंद्र प्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ, पंचायत समिती बीड उषा लोंढे, एकल महिला संघटनेच्या रुक्मिणी नागापुरे, राखीव दलाचे. पो. ▶ उर्वरित पान २ वर



*माजलगाव बीड अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड च्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड.सुभाष भाऊ राऊत, नानासाहेब मस्के, शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे, अजिंक्य सुरवसे, तुषार लोंढे यांच्यासह समता सैनीक उपस्थित होते.*

# खुनाच्या गुन्ह्यातील जामिनावर सुटलेल्या आरोपीला गावबंदी

**• सचिन चव्हाण धमकी देत असल्याची मयत मुलाचे वडील ज्ञानेश्वर राठोड यांची तक्रार ;**
**• मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल -सपोनी मनोज निलंगेकर**

**तलवाडा । प्रतिनिधी**

पोईतांडा येथील रामेश्वर ज्ञानेश्वर राठोड यास दिनांक ५ एप्रिल २०२३ रोजी हॉटेल त्रिमूर्ती याठिकाणी अमानुष मारहाण करण्यात आली होती यामध्ये त्याचा मृत्यू झाल्या प्रकरणी मुख्य सचिन चव्हाण यांच्यासह सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्यातून जामिनावर आलेल्या सचिन चव्हाण यास पोइंतांडा गावात बंदी करण्याचे आदेश मा.न्यायालयांनी दिले असून मयत मुलाचे वडील ज्ञानेश्वर राठोड यांनी ही तलवाडा पोलिस ठाण्यात दिनांक १ ऑगस्ट रोजी तक्रार अर्ज दिला आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, २०२३ मध्ये तलवाडा येथील हॉटेल त्रिमृती याठिकाणी रामेश्वर राठोड यास सात ते आठ जणांनी मिळून अमानुष मारहाण करण्यात आली होती यामध्ये त्याचा मृत्यू झाला होता या प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात केस नंबर ८७/२०२३ कलम ३०२,२०१, १४३, १४७,१४८, १४९, १२०इ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.यामध्ये सर्वांची बीड कारागृहात रवानगी करण्यात आली होती.परंतु यामध्ये सर्वांना मा.न्यायालयाने जामीन दिला असून जामिनावर सुटलेल्या आरोपी मधील पोइतांडा येथील आरोपी सचिन चव्हाण हा गावात ▶ उर्वरित पान २ वर

**मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारवाई करू : सपोनी मनोज निलंगेकर**

**मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उचित कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल,सदरील आरोपीचे कोणतेही गैर वर्तन खपवून घेतले जनार नाही.पोलिस प्रशासन कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कायम तत्पर असून आरोपी विरुद्ध योग्य कार्यवाही करण्यात येईल.**